**Gomantak, Saturday 05 October 2019**

गोमन्तक




सांगे : प्लास्टिक मुक्तीसाठी स्वच्छता मोहिमेत सहभागी नेचरर्स ऑफ नेचर या संघटनेचे कार्यकर्ते.

# सांगेत युवावर्गातून स्वच्छता मोहीम

**सांगे,** ता. ४ (प्रतिनिधी) : निसर्ग रक्षणासाठी काही तरी केले पाहिजे, या विचारातून स्थापन केलेल्या नेचरर्स ऑफ नेचर या संघटनेने गांधी जयंतीचा मुहूर्त साधून सुलकर्ण ते कोळंबपर्यंतचा प्लास्टिक कचरा गोळा करून इतर युवका पुढे एक चांगले उदाहरण ठेवले आहे.

साधारण पंचवीसे युवक-युवतीचा हा गट प्लास्टिक व कचरा स्वच्छता करण्यासाठी सुलकर्ण डॉन बॉस्को कॉलेज ते कोळंबपर्यंत रस्ता दुतर्फा प्लास्टिक कचरा, इतर कचरा गोळा करीत कोळंबपर्यंत रस्ता साफ केला. साधारण शंभर किलो प्लास्टिक कचरा या वेळी गोळा करण्यात आला.

या प्रसंगी कृतिका राऊत म्हणाल्या, निसर्गाचे रक्षण आपण केल्यास निसर्ग आपले रक्षण करतील. मात्र निसर्गाकडे दुर्लक्ष केल्यास त्यांचा परिणाम भोगावा लागतो.राज्यात निसर्गाने जे काही केले. तीच परिस्थिती आपल्याला भोगावी लागेल म्हणून प्लास्टिक वापर बंद करून त्याला पर्याय म्हणून कापडी पिशव्या वापरण्याचे आवाहन करून निसर्ग रक्षणा साठी पुढाकार घेतलेल्या नेचरर्स ऑफ नेचर संघटनेतील सर्वांचे अभिनंदन केले.

जिल्हा पंचायत अध्यक्ष नवनाथ नाईक व रिवण ग्रामपंचायत सरपंच सूर्या नाईक यांनी नेचरर्स ऑफ नेचर या संघटनेच्या सर्व सहभागी सदस्यांचे चांगला उपक्रम राबविल्या बद्दल अभिनंदन केले. उत्कर्ष सावंत देसाई यांनी स्वच्छता अभियानात सहभागी झालेल्या सर्वांचे आभार व्यक्त केले.

Goa, Goa-Today
05/10/2019 Page No. 1